इयत्ता अकरावीचे प्रवेश देताना क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांना ५ टक्के जागा राखून ठेवणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक: एचएससी १७०७/(२२२/०७)/उमाशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २६ जून, २००८.

संदर्भ:- १) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक एचएससी १०९७/(१४४४/९७)/ उमाशि-१, दिनांक २६ .६. १९९७.

२) शासन शुध्दीपत्रक क्रमांक, शालेय शिक्षण विभाग,एचएससी १०९७/(१४४४/९७)/उमाशि-१, दिनांक १० .७. १९९७.

३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक एचएससी १०९७/(१६०३/९७)/ उमाशि-१, दिनांक २५ .६. १९९८.

४) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो/१०९८/ प्र.क्र.५/क्रीयुसे -१ , दिनांक २७.२.१९९८

५) शासन शुध्दीपत्र , समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो/१०९८/ प्र.क्र.५/क्रीयुसे -१ , दिनांक ७.६.१९९९.

६) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक एचएससी १७०५/ ८९९०/(२९७/०५)/उमाशि-१, दिनांक २३.६.२००६

७) शासन पत्र शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक एचएससी १७०६/(४९/०६)/उमाशि-१, दिनांक २१ .९.२००६.

८) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक एचएससी १७०६/(४९/०६)/उमाशि-१, दिनांक ९ .१०.२००६.

९) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्रमांक एचएससी १५२००७/६३११४/१२एचएस/१६९५, दिनांक २३.८.२००७

१०) संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे पत्र क्रमांक प्रग्राध/८०१०/०६-०७/(६४)/का-४, दिनांक २६.९.२००६

**शासन निर्णय :-** राज्यात इयत्ता ११ वी च्या प्रवेशासंदर्भात करावयाची कार्यवाही शासनाकडून वेळोवेळी निश्चित करुन देण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील विविध प्रवर्गाकरिता निर्धारित केलेल्या आरक्षणाच्या प्रमाणानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे बंधन कनिष्ठ

महाविद्यालयाच्या व्यवस्थापनावर आहे. उपरोक्त संदर्भाधिन क्र.१ च्या शासन निर्णयान्वये कला, क्रीडा क्षेत्रात जिल्हा/राज्य/राष्ट्रीय पातळीवर प्रथम वा द्वितीय क्रमांक मिळविणा-या विद्यार्थ्यांसाठी २% जागा राखून ठेवण्याबाबतचे आदेश आहेत. भारतीय शालेय खेळ महासंघ तसेच भारतीय क्रीडा प्राधिकरण आणि इंडियन ऑलिंपिक असोसिएशन द्वारा एकविध खेळांच्या मान्यता प्राप्त संघटनेच्या प्रमाणपत्रांना इयत्ता ११ वी च्या प्रवेशासाठी ग्राह्य धरली जात नसल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे. संदर्भाधिन शासन निर्णय दिनांक २६ जून,१९९७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कला, क्रीडा क्षेत्रात जिल्हा/राज्य/राष्ट्रीय पातळीवर प्रथम वा द्वितीय क्रमांक मिळविणा-या विद्यार्थ्यांबरोबरच खालील संघटनांद्वारे आयोजित केलेल्या क्रीडा स्पर्धांमध्ये खालीलप्रमाणं विद्यार्थ्यांना देखील इयत्ता ११ वी प्रवेशासाठी ५% आरक्षणांतर्गत सवलत देण्याबाबत शासन असा आदेश देत आहे की,

१) भारतीय शालेय खेळ महासंघ व भारतीय खेळ प्राधिकरणद्वारा स्पर्धांमध्ये:-

अ) विभागीय स्पर्धेतील पदक विजेते खेळाडू ,

ब) राष्ट्रीय/राज्य स्पर्धेतील सहभागी खेळाडू,

२) तसेच इंडियन ऑलिम्पिक असोसिएशन व महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन द्वारा एकविध खेळांच्या मान्यताप्राप्त संघटनेने आयोजित केलेल्या स्पर्धांमध्ये

अ) राज्यस्तर अधिकृत अजिंक्यपद स्पर्धेतील पदक विजेते खेळाडू,

ब) राष्ट्रीय व राज्य अधिकृत स्पर्धेतील सहभागी खेळाडू

खेळाडूंना राखीव जागेवर प्रवेश देताना खेळातील उच्च अर्हता प्राप्त असणा-या खेळाडूला प्राथम्य देण्यात यावे.

२. उक्त स्पर्धांचे प्रमाणपत्र जिल्हा क्रीडा अधिकारी / विभागीय क्रीडा उपसंचालक यांचेकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे.

३. अशा शालांत परीक्षा उत्तीर्ण झालेल्या सर्व खेळाडूंना इयत्ता ११ वी च्या प्रवेशासाठी ५% जागा राखून ठेवण्यात याव्यात व या जागा गुणवत्तेनुसार भराव्यात. वरीलप्रमाणे ५% जागांवरील काही जागा रिक्त राहिल्यास तसेच इतर रिक्त जागा राहिल्यास त्या जागा देखील शाळा/महाविद्यालयांनी संबंधित शिक्षण उपसंचालकांकडे/शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्याकडे त्वरित प्रत्यार्पित कराव्यात.

४. राज्यातील बरीचशी कनिष्ठ महाविद्यालये इयत्ता ११ वीचे प्रवेश देताना आरक्षणाचे नियम पाळत नाहीत. क्रीडा क्षेत्रात प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांना शाळा/कॉलेज मधील प्रवेशासाठी उपरोक्त प्रमाणे जागा राखून ठेवण्यात आल्या असल्या तरी त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नाही. या जागा इतर प्रवर्गातून भरल्या जातात. प्रस्तुतची बाब शासनाच्या निदर्शनास आल्यास याबाबत संबंधित शिक्षणाधिकारी/ शिक्षण निरीक्षक व विभागीय शिक्षण उपसंचालक यांना व्यक्तिशः जबाबदार धरण्यात येईल व त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई

करण्यात येईल अशा सक्त सूचना सर्व क्षेत्रिय अधिका-यांना या परिपत्रकाद्वारे देण्यात येत आहेत.

५. क्रीडा क्षेत्रात वरीलप्रमाणे प्राविण्य मिळविणा-या विद्यार्थ्यांना शाळा/कॉलेजमध्ये प्रवेशासाठी राखून ठेवलेल्या जागा भरण्याबाबतची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यात यावी. जे संस्थाचालक आदेशाची अंमलबजावणी करणार नाहीत त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय २००८-०९ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यात येत आहे.

७. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in. या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २००८०६२६१६२७२०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

( अ.मा.भट्टलवार )
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे(५ प्रती)
संचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती)
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य
सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) , जिल्हा परिषदा
सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी
सर्व शिक्षण निरीक्षक (दक्षिण/उत्तर/पश्चिम), बृहन्मुंबई
अवर सचिव (माशि-२/क्रीयुसे), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
कक्ष अधिकारी (माशि-३/क्रीयुसे-१/२), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (क्रीडा व युवक कल्याण) यांचे खाजगी सचिव
महासंचालक, माहिती व जनसंपर्क,महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई
त्यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयास सर्व प्रसिध्दी माध्यमांद्वारे व्यापक प्रसिध्दी द्यावी.
निवडनस्ती-उमाशि-१/क्रीयुसे-१